# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 24.07.2024** **वार – बुधवार**

---

**पाणी**

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदीपात्रात सुरू असलेला विसर्ग आज सायंकाळी कमी करण्यात आला. पावसाच्या प्रमाणानुसार विसर्ग कमी किंवा जास्त होऊ शकतो. नदीकाठच्या गावातील नागरिकांनी खबरदारी घ्यावी असं आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे.

इंद्रायणी नदीवरील मोई गावाकडे जाणाऱ्या पुलावरून पाणी वाहत असल्यानं तो वाहतुकीस बंद करण्यात आला असून तिथं पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

**मतदार**

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांचा 1 जुलै 2024 या अर्हता दिनांकाच्या आधारावर सुधारित विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम निवडणूक आयोगानं जाहीर केला आहे. त्यानुसार पात्र नागरिकांनी येत्या 16 ऑगस्टपर्यंत मतदार नोंदणी करावी, असं आवाहन जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी केलं आहे.

**वर्तुळमार्ग**

पुण्यातील बहुचर्चित वर्तुळाकार मार्गाच्या खर्चासाठी खुल्या बाजारातील कर्जरोख्यांच्या माध्यमातून 5 हजार 500 कोटी रुपयांचा निधी उभारण्याचा निर्णय राज्य रस्ते विकास महामंडळानं घेतला आहे. एकंदर 136 किलोमीटर लांबीचा हा वर्तुळाकार मार्ग असून शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागातून तो जाणार आहे. या मार्गाच्या उभारणीचं कंत्राट घेण्यासाठी एकंदर 19 मोठ्या खासगी कंपन्यांनी तयारी दर्शवली आहे.

**प्रावरणे**

लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे स्वच्छ संस्थेच्या कर्मचाऱ्यांना रेनकोट, गमबूट हातमोजे ही सुरक्षा प्रावरणं पुरवण्याच्या निविदेला उशीर झाला आहे. ही निविदा स्थायी समिती समोर मान्य झाल्यानंतर लगेचच कर्मचाऱ्यांना साहित्य पुरवले जाईल असं महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी स्पष्ट केलं आहे. शहरात स्वच्छ संस्थेच्या 3 हजार 850 पेक्षा जास्त कचरावेचकांकडून घरोघरी जाऊन कचरा गोळा केला जातो.

**उरुळी-कचरा**

उरुळी देवाची इथं जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी काढलेल्या बायोमायनिंगच्या 100 कोटींच्या निविदेत योग्य स्पर्धा होईल याची पुरेपूर काळजी घेण्यात येईल असं पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केलं आहे. या निविदेच्या बैठकीमध्ये ठेकेदारांनी विशिष्ट अटी आणि नियमांमुळं स्पर्धा होणार नाही असं मत मांडलं होतं. फुरसुंगी-उरुळी देवाची इथल्या कचरा डेपोमध्ये वर्षानुवर्षे कचरा उघड्यावर टाकण्यात आला आहे. त्यावर प्रक्रिया करण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे.

**<u>दिव्यांग</u>**

दिव्यांग प्रमाणपात्रासाठी विशिष्ट ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र ते काढण्यासाठी दिव्यांगांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. तपासणीसाठी रुग्णालयामध्ये त्या संदर्भातील तज्ज्ञ उपलब्ध असतीलच असं नाही. त्यामुळे पुन्हा वेगळ्या रुग्णालयाची निवड करावी लागते. कोणत्या रुग्णालयामध्ये कोणते तज्ज्ञ उपलब्ध आहेत यासंदर्भात माहिती उपलब्ध व्हावी, अशी मागणी पुणे संयुक्त दिव्यांग हक्क सुरक्षा समितीचे अध्यक्ष हरिदास शिंदे यांनी केली आहे.

**<u>बहीण</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभ घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अंतर्गत आतापर्यंत 27 हजार 186 अर्ज  भरण्यात आले आहे.  क्षेत्रीय अधिका-यांना दिलेली जबाबदारी त्यांनी योग्यरित्या पार पाडावी असं आवाहन समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे यांनी केलं आहे.

**<u>टोमॅटो</u>**

मुसळधार पावसामुळं टोमॅटोचे उत्पादन अचानक मोठ्या प्रमाणावर घटलं आहे. पुण्याच्या किरकोळ बाजारात टोमॅटोच्या दरानं शंभरी ओलांडली आहे. अन्य भाज्यांचे दर देखील कडाडले आहेत.

**<u>बाबा</u>**

आजच्या काळात अभिजन आणि बहुजन यातील भेदरेषा पुसल्या गेल्या पाहिजेत. एकात्मतेसाठी विचारपातळीवर सर्वांनी समता, शांतता, करुणावादी विचारांचा जागर केला पाहिजे, अशी अपेक्षा ज्येष्ठ विचारवंत, डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी पुण्यात व्यक्त केली. पाली-मराठी भाषेचे पहिले शब्दकोशकार बाबा भारती यांचं जन्मशताब्दी वर्ष आणि 34व्या स्मृतिदिनाप्रित्यर्थ बाबा भारती प्रतिष्ठान, पुणे यांच्यातर्फे  विविध पुरस्कारांचं वितरण करताना डॉक्टर सबनीस बोलत होते. बाबा भारती यांचा समतेचा आणि शांततेचा संदेश महेंद्र भारती पुढे नेत आहेत, ही गौरवाची बाब असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<u>झाडे-अग्नीशमन</u>**

पावसामुळं पुणे शहरात 24 ठिकाणी झाडपडीच्या घटना घडल्या. अग्निशमन दलानं पडलेली झाडं बाजूला करून रस्ते मोकळे केले. यामध्ये कोणतीही जखमी अथवा जीवितहानी झाली नाही.

**<u>क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीनं सुरु असलेल्या स्पार्टन मान्सुन लीग अजिंक्यपद टी-20 क्रिकेट स्पर्धेत निखील नासेरी यानं फटकावलेल्या 127 धावांच्या जोरावर पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबने गट्स अँड ग्लोरी संघाचा 158 धावांनी सहज पराभव केला. अन्य दुसऱ्या सामन्यात विपुल खैरे यानं केलेल्या अष्टपैलु खेळीच्या जोरावर लिजंड्स स्पोटर्स क्लबनं रॉयल स्पोर्ट क्लबचा 4 गडी राखून पराभव करत विजयांची हॅट्ट्रीक नोंदवली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**